

Golden Research Thoughts ORIGINAL ARTICLE ISSN:-2231-5063

Golden Research Thoughts



# यशवंतराव चव्हाण – व्यक्ती आणि वाङ्मय




*सारांश :-*

देशाचे उपपंतप्रधान, आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार, देशाचे गृहमंत्री, अर्थमंत्री, परराष्ट्रमंत्री, संरक्षणमंत्री अशा विविध पदाच्या माध्यमातून ज्यांनी जगाच्या, देशाच्या, महाराष्ट्राच्या इतिहासात नावलैकिक प्राप्त केला, ते यशवंतराव चव्हाण म्हणजे 'झाले बहू, होतील बहू... परि यासम हेच....' अशा यशवंतरावांचे व्यक्तिमत्त्व आणि साहित्य मराठी भाषा, संस्कृती व माणसाला भूषणावह आहे. त्यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचे दर्शन दिशादर्शक आहे.

*बाबुराव उपाध्ये*

विभाग प्रमुख व सहयोगी प्राध्यापक,
रा. ब. नारायणराव बोरावके
महाविद्यालय, श्रीरामपूर.
जि. अहमदनगर.

### प्रस्तावना :-

### संघर्षमय जीवनकथा :

यशवंतराव चव्हाण यांचा जन्म 12 मार्च 1913 रोजी झाला. सांगली जिल्ह्यातील देवराष्ट्र या छोट्या खेड्यात आईच्या माहेरी जन्म घेतलेल्या यशवंतरावांचे बालपण निसर्गसहवासात गेले. त्यांची आई विठाई व वडील बळवंतराव शेतीची, कष्टाची कामे करीत असत. विठाई व बळवंतराव यांना चार अपत्ये झाली. ज्ञानोबा, राधाबाई, गणपतराव व यशवंतराव ह्या चारही अपत्यांच्या जीवनात पितृछाया फार दिवस लाभली नाही. 1918 मध्ये प्लेगच्या साथीत बळवंतरावांचे निधन झाले. संसाराचा सारा भार विठाईवर येऊन पडला. यावेळी यशवंतराव केवळ पाच वर्षाचे होते. विठाई ज्ञानोबासह कराडहून रेल्वेने सातारला गेल्या. जिल्हा न्यायधीशांना आपली कैफियत सांगितली. न्यायधीशांनी बळवंतरावाच्या बेलिफ जागेवर ज्ञानोबांना नोकरी देण्याचा हुकूम सोडला. गणपतराव व यशवंतरावांना विठाईने शाळेत घातले. त्यासाठी कराड येथे वास्तव्य केले. कष्टाची कामे करीत यशवंतरावांच्या आईने मुलांना शिक्षण दिले. त्यांच्या मनात उज्ज्वला आकांक्षा निर्माण केल्या. मुलांना जीवनात उभे केले. यशवंतरावांनी बी.ए. एल.एल. बी. पर्यंत शिक्षण घेतले. त्यांना मुंबईहून वकिलीची सनद मिळाली. कराड येथे त्यांनी वकिली केली. 1918 ते 1941 या कालखंडात शिक्षण घेत असतानाच त्यांनी भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात भाग घेतला. शाळेत असतानाच ते झेंडावंदन केले. 1932 ला झेंडावंदनात भाग घेतल्याबद्दल त्यांना तुरूंगावास भोगावा लागला. 1933 मध्ये त्यांची येरवडा तुरूंगातून सुटका झाली. याच काळात त्यांनी श्ज्ञानप्रकाशश या वृत्तपत्रात पत्रकार म्हणून काम केले.

यशवंतराव चव्हाण यांची जीवनकथा स्फूर्तीप्रद आहे. 'कथारूप यशवंतराव' या प्रा. नवनाथ लोखंडे यांच्या संपादनग्रंथात यशवंतरावांच्या जीवनावर प्रकाश पाडू शकतील अशा कथा आहेत. अॅड. रामनाथ वाघ (अहमदनगर) यांनी 'युगप्रवर्तक यशवंतराव' या संपादित ग्रंथात यशवंतरावांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचा शोध व बोध घेतला आहे.

यशवंतराव चव्हाण आपल्या जीवनातील आईचे महत्त्व सांगतात. "आमचं घर हे गावातल्या सामान्य शेतकऱ्याचं घर होतं खेड्यात राहणाऱ्या लहान आणि गरीब घरातील मुलांच्या प्रमाणेच माझे बालपण जात होते. अडीअडचणी, गरिबी, कष्ट आणि वागवणूक यालाच जीवन असे म्हणत असत. घरची गरिबी होती. लहानपणीच मला पितृप्रेमाला वंचित व्हावे लागले आईने मुलांना जगविण्यासाठी, वाढविण्यासाठी काबाडकष्ट उपसले. हे सर्व खरं, परंतु आमच्या आईने गरिबीचे काही भांडवल केले नाही. आईला एकटीला, एकाकी पध्दतीने सारे करावे लागत होते. तरीपण संकटकालीन परिस्थितीला ती शरण गेल्याचे स्मरण नाही. सातत्याने ती सामोरे जात राहिली."01

यशवंतरावांचे जीवन आईच्या संस्काराने आणि विचारकार्याने प्रभावित झालेले होते. त्यामुळे यशवंतराव आपल्या आईविषयी पुढे लिहितात.

"माझी आई शिकलेली नव्हती. परिस्थिती गरिबीची होती. परंतु मनानं, संस्कारानं ती श्रीमंत होती. देवावर तिची अखंड निष्ठा होती. संकटाला ती शरण, गेली नाही, त्याचं ते प्रमुख कारण असलं पाहिजे. आईने मला गरिबीत वाढवलं परंतु आपल्या मनाची संस्काराची संपूर्ण श्रीमंती तिनं मला दिली. मी माझं जीवन विचारी, कृतीशील आणि त्या अर्थानं संपन्न बनवू शकलो ते आईने रूजविलेल्या संस्काराची संपूर्ण श्रीमंती तिनं मला दिली. मी माझं जीवन विचारी, कृतीशील आणि त्या अर्थानं संपन्न बनवू शकलो ते आईने रूजविलेल्या संस्कारामुळे होय अशी माझी नम्र भावना आहे. मन विधायक प्रवृत्तीनं भारलं गेलं ही देणगीही त्या संस्काराची"02

यशवंतराव चव्हाण यांचा 2 जून 1942 रोजी फलटण येथील मोरे कुटुंबातील वेणूताईशी विवाह झाला. त्यांचा संसार सर्वसामन्याप्रमाणेच राहिला. एक निरपेक्ष, सेवाभावी राजकारण करीत असलेल्या यशवंतरावांनी प्रपंच हा आपल्या स्वतःच्या पैशातून चालविला. श्प्रपंची जाणे राजकारणश ही सज्जगडावरील समर्थांची शिकवण यशवंतरावासमोर होती. ते प्रापंचिक होते व राजकारणीही होते. परंतु दोन्ही विषय त्यांनी स्वतंत्र मानले. 1942 च्या क्रांतीलढ्यात ते सहभागी झाले. पोलिसांनी अटकसत्र सुरू केले. यशवंतराव भूमिगत झाले. यशवंतराव सापडत नाही म्हणून पोलिसांनी बंधू गणपतराव आणि सौ. वेणूताईंना अटक केली यशवंतरावांचा प्रपंच राष्ट्राच्या सेवेत रमला होता. यशवंरावरावांच्या थोरल्या बंधूच्या आजारी अवस्थेत सौ. वेणूताईंनी खूप सेवा केली पण ज्ञानोबांचे 1943 मध्ये निधन झाले. 15 डिसेंबर 1947 रोजी गणपतरावांचे क्षय रोगाने निधन झाले. या सेवाशुसेतून सौ. वेणूताईंनाही क्षयरोग झाला. तीन वर्षे आमदार राहिलेले यशवंतरावांजवळ पत्नीच्या आजाराची पैसे नव्हते. वेणूताईंना मूलबाळ होणार नाही. यशवंराव त्यावेळी 35 वर्षे वयाचे होते. डॉक्टरांनी वेणूताईंविषयी सांगितल्यावर यशवंराव दुसरे लग्न करू शकले असते. नातलगानाही खूप आग्रह केला पण त्यांनी तसे केले नाही. पत्नीवर नितांत प्रेम करणारे यशवंराव आगळे वेगळेच होते. 1 जून 1983 रोजी वेणूताईंचे निधन झाले.

रामनाथ वाघ लिहितात, "सौ. वेणूताईंच्या निधनामुळे यशवंतरावांच्या जीवनात मोठीच पोकळी निर्माण झाली. त्यांच्या जीवनावर अतिशय गंभीर परिणाम झाले. ते हळवे होते. ते लहान मुलासारखे ओक्साबोक्सी रडले. त्यानंतर ते सतत निराशेच्या छायेतच वावरत होते. एकाकी जीवन जगणे त्यांना अतिशय अवघड होत होते. यशवंतरावांचे सौ. वेणूताईंवर नितांत प्रेम होते."03

यशवंतराव व सौ. वेणूताई यांचा संसार आदर्शाची वाटचाल आहे. कुठेही प्रवासात जाताना ते वेणूताईंना बरोबर नेत असत. आजारी असताना वेणूताई प्रवासाला गेल्या नाहीत. त्यावेळी यशवंतरावांनी पत्नीशी पत्रव्यवहार केला. 'विदेश दर्शन', 'विरंगुळा' या पुस्तकात हे पत्र संग्रहीत आहेत.

यशवतंरावांचे जीवन कृतीशील होते. "आधी केले मग सांगितले" असे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते. 1940 साली ते सातारा जिल्हा कॉंग्रेसचे अध्यक्ष झाले. 1946 साली सातारा मतदार संघातून ते विजयी झाले. 1946 साली सातारा मतदार संघातून ते विजयी झाले. 1948 मध्ये ते महाराष्ट्र प्रदेश क्रॉंग्रेसचे सरचिटणीस झाले. 1952 च्या निवडणुकीत कराड मतदार संघातून ते निवडून आले. नागरी पुरवठामंत्रीही झाले. 1956 मध्ये द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्री झाले. 1957 च्या निवडणुकीत विजयी झाले. 1 मे 1960 रोजी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. 1972 व पुढच्या अनेक निवडणुकीत ते विजयी ठरले जुलै 1979 च्या चरणसिंग यांच्या संयुक्त मंत्रीमंडळात ते उपपंतप्रधान झाले. यशवंतरावांचे जीवनकार्य अष्टपैलू आहे. 25 नोव्हेंबर 1984 रोजी त्यांचे 71 व्या वर्षी निधन झाले.

*यशवंतराव चव्हाण यांचे वाङ्मय :*

यशवंतराव चव्हाण (12 मार्च 1913 ते 25 नोव्हेंबर 1984) यांचे राजकीय क्षेत्रातील स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे तसेच त्यांचे वाङ्मय क्षेत्रातील कार्यही प्रेरणापूर्ण आहे. मराठी भाषा, मराठी संस्कृती आणि मराठी माणसाला भूषणावह वाटेल असे त्यांचे लेखन आहे. आत्मचरित्र, वैचारिक लेखन, पत्रवाङ्मय, भाषणसंग्रह, प्रवासवर्णन व इत्यादी विविध वाङ्मय प्रकारात त्यांचे लेखन प्रकाशित आहे. त्यांचा या लेखनकार्यातील सहभाग मौलिक आहे.

01. 'कृष्णाकाठ' (07 फेब्रुवारी 1974) यशवंतराव चव्हाणयांचे 'कृष्णाकाठ' हे आत्मचरित्र प्रकाशक प्रेस्टीज पब्लिकेशन्स, पुणे यांनी प्रकाशित केले. हा पहिला खंड यशवंतराव चव्हाण यांच्या जीवनातील 'जडणघडण' (पृ.9 ते 90), 'वैचारिक आंदोलन' ;पृ.91 ते 196द्ध, 'निवड' (पृ.197 ते 314) अशी या पुस्तकामध्ये विषयानुरूप मांडणी करण्यात आलेली आहे. 'कृष्णाकाठ' सौ. वेणूताईंना समर्पित आहे. यशवंतरावांनी लिहिले आहे, "आईच्या पाठोपाठ माझ्या जीवनाला आकार आणि आशय देणारी माझी प्रिय पत्नी सौ. वेणूताई हिच्या स्मृतीस" असा अर्पणपत्रिकेत उल्लेख आहे. 'कृष्णाकाठ' या आत्मचरित्रामध्ये यशवंतराव चव्हाण यांचे बालपण शिक्षण आणि कौटुंबिक संघर्षाचा इतिहास चित्रित झाला आहे. 'वैचारिक आंदोलन' या भागात यशवंतराव यांचे राष्ट्रीय आंदोलनात कार्य आणि राजकीयजीवनाचा प्रवास चित्रित झाला आहे. 'निवड' या भागामध्ये लॉ कॉलेजचे शिक्षण, वकिली स्वातंत्र्याची चळवळ, पार्लमेंटरी सेक्रेटरी, इतर जीवनप्रवास या चित्रित झाला आहे.

यशवंतराव चव्हाण लिहितात, "देवराष्ट्र हे माझे जन्मगाव आणि आजोळ असल्यामुळे माझ्या अगदी लहानपणच्या आठवणी ह्या देवराष्ट्राच्या आठवणी आहेत. माझ्या जीवनातल्या पहिल्या चार–पाच वर्षाच्या ज्या आठवणी आहेत. त्या देवराष्ट्र वडगाव, कुंडल, ताकारी या गावाशी निगडित आहेत. ग्रामीण जीवनाची पार्श्वभूमी हा माझ्या जीवनाचा श्री गणेशा आहे. पुढे मी राजकीय कामानिमित्त आणि सरकारी कामासाठी देशांतर्गत आणि सर्व जगात खूप फिरलो. तरी पण या परिसराची ओढ माझ्या मनात कायमची राहिली आहे. असे का होते, ते मला माहिती नाही. पण वस्तुस्थिती ही अशी आहे." ('कृष्णाकाठ' पृ. 11)

देवराष्ट्र या छोट्या गावातले त्यांचे बालपण त्यांच्या मनीमानसी मुरले आहे. शेतकरी घराण्यातील यशवंतराव त्याच परिस्थितीत जगले नि वाढले. त्यामुळे शेती आणि मातीचे प्रेम त्यांच्या मनात रूजले आहे. खानापूर (जि. सांगली) तालुक्यातील ढवळेश्वर हे यशवंतराव चव्हाण यांचे मूळ गाव त्यांची आई विठाई ही देवराष्ट्र गावची होती. बळवंतराव व विठाई यांना चार अपत्ये झाली.

1.) ज्ञानोबा 2.) राधाबाई 3.) गणपतराव 4.) यशवंतराव या चार अपत्यांचा सांभाळ विठाईने काळजीपूर्वक केला. यशवंतराव पाच वर्षाचे होते. त्यावेळी म्हणजे 1917–18 च्या सुमारास प्लेगची साथ आली. त्यामध्ये बळवंतरावांचे निधन झाले. मग विठाई देवराष्ट्र या माहेरी मुलांना घेऊन गेल्या.

डॉ. रा. रं. बोराडे लिहितात, "यशवंतरावांच्या आईवर विठाबाईवर आभाळ कोसळलं. काय करायचं, कसं जगायचं हा त्यांच्यासमोर प्रश्न उभा राहिला उत्पन्नाचं कसलंही साधन नाही. विट्याला थोडी शेती होती हे खरं, पण शेतीतलं उत्पन्न इतकं कमी होतं की ते नसल्यात जमा होतं आपल्यासहीत आपल्या चिमण्यांचा उदरनिर्वाह कसा करायचा, त्यांच्या शिक्षणाची काय सोय करायची हा विठाबाईंना प्रश्न पडला."04

यशवंतरावांचं बालपण प्रतिकूल परिस्थितीतून आकाराला आलं. विठाईमातेने माहेरचा किंवा सासरचा आश्रय घेण्यापेक्षा स्वावलंबनाचा मार्ग स्वीकारला बळवंतरावांचे निधन झाल्यावर विठाई सातारला गेल्या. न्यायधीशांना भेटल्या. आपली कर्मकथा सांगितली. ज्ञानोबा यांना बेलिफची नोकरी मिळाली. विठाईने कराडला संसार थाटला. यशवंराव व गणपतरावांना शाळेत घातले. आपल्या आईविषयी 'कृष्णाकाठ' मध्ये यशवंतराव लिहितात, "आई माझ्याकडून अधून मधून सासरेबुवांची 'सार्थ ज्ञानेश्वरी' वाचून घेत असे. ज्ञानेश्वरी समजायला जरा अवघडच. जुनी भाषा असल्यामुळे वाचून घेत असे. त्यातला अर्थ मलाही जसा समजायला पाहिजे होता, तसा समजत नव्हता. पण मी वाचे, ते ती भक्तिपूर्वक ऐकत असे एका आठवड्यात मी तिला दोन अध्याय वाचून दाखविले, तेव्हा मी तिला विचारले, "आई, तू हे सगळे ऐकून घेतलेस, त्याचा सारांश तुझ्या मनाशी काय आला. ?"

तिने मला एका वाक्यात सांगितले, "कृष्णदेव अर्जुनाला सांगतात, की तू आपला 'मी' पणा सोड आणि जे तुझे काम तू केले पाहिजेस, ते तू करीत राहा असे सगळे ते सांगत आहेत आणि ते बरोबर आहे" ('कृष्णाकाठ' पृ. 50–51)

'कृष्णाकाठ' या आत्मचरित्रामध्ये यशवंतरावांचा संघर्षशील जीवनाचा चरित्र इतिहास साकार झाला आहे. या कालखंडात यशवंतराव राष्ट्रीय चळवळीत उतरले. त्यावेळी ते टिळक हायस्कूलमध्ये शिक्षण घेत होते. यशवंराव इयत्ता 7 वी मध्ये होते. एका सभेत केशवराव जधे व दिनकरराव जवळकर यांनी टिळकांवर टीका केली. ती यशवंतरांवाना आवडली नाही. इंग्रजांविरूध्द कणखरपणे लढा उभारणारे महाराष्ट्रीयन लो. टिळकांचा यशवंरावांना सार्थ अभिमान वाटत होता. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या रत्नगिरीतल्या भेटीचाही अभिमान यशवंतरावांना आहे. 1930 पर्यंतच्या चळवळीचा इतिहास 'जडणघडण' या पहिल्या प्रकारणात आहे.

दुसरे प्रकरण 'वैचारिक आंदोलन' हे यशवंतरावांच्या कर्तृत्व व नेतृत्वाचा परिचय घडवून देणारे आहे. श्ज्ञानप्रकाशश या वर्तमानपत्रात यशवंतराव वार्ताहर होते. तर तिसरे प्रकारण 'निवड' असे आहे. 22 एप्रिल 2012 रोजी जन्मशताब्दी निमित्त नवीन विशेष जन–आवृत्ती रोहन प्रकाशन यांनी प्रकाशित केली. पुनर्मुद्रण मे 2012, जुलै 2012 मध्ये झाले. 'कृष्णाकाठ' च्या या आवृत्तीत 1963 साली नाशिक जिल्ह्यातून यशवंतरावांनी निवडणूक लढविली. तोही संदर्भ आहे. म्हणजे 'कृष्णाकाठ' चा खंड पहिला असा उल्लेख असला तरी 'कृष्णाकाठ' मध्ये यशवंतरावांच्या एकूण व्यक्तिमत्त्वाचा परिचय होतो. 'कृष्णाकाठ' ची वाङ्मयीन वैशिष्ट्ये नजरेत भरणारी आहेत.

भास्कर लक्ष्मण भोळे लिहितात, "साहित्यास्वादकाची भूमिका आपली प्राथमिक भूमिका आहे. असे यशवंतराव म्हणत असले तरी, अगदी ललितलेखन त्यांनी आयुष्यात फार पूर्वीच सोडून दिले असले, तरीही त्यांचे मन मात्र अखेरपर्यंत कलावंताचेच होते. निसर्गात रमणे, मनःपूर्वक एखादा अनुभव घेणे, भूतकाळातल्या कडूगोड आठवणींची प्रसंगोपात्र उजळणी करणे, लोकजीवनाच्या संजीवक संपर्काला प्रयत्नपूर्वक जोपासणे, बुध्दिइतकेच भावनेलाही तीक्ष्ण राखणे ही सारी त्यांच्यातल्या जिवंत कलावंताचीच लक्षणे होती."05

'कृष्णाकाठ' च्या माध्यमातून यशवंतरावांच्या जीवनचरित्राच्या परिचय होतो. या आत्मचरित्राची गुणवत्ताही लक्षात येताना जान्हवी संत लिहितात, "आत्मचरित्राच्या अंगी शालिनता, दुसऱ्या बद्दलची आपुलकी, समयसूचकता, हृदयसंगम व सरसभाषाशैली हे गुणही आवश्यक आहेत."06

यशवंतराव चव्हाण यांचे लेखन विविध प्रकारचे आहे. त्या त्या लेखनाचा एक वेगळा प्रभाव वाचकांवर आहे.

### *यशवंराव चव्हाण यांचे इतर लेखन :*

भाषणसंग्रह 'सह्याद्रीचे वारे' (1962) , 'भूमिका' (1969) , 'युगांतर' (1979), लेखसंग्रह– 'ऋणानुबंध' (1979) पत्रसंग्रह– 'विदेशदर्शन' (प्रवासवर्णन) , संपादक – रामभाऊ जोशी

यशवंतराव चव्हाण यांचे साहित्यिक व्यक्तिमत्त्व राजकीय पार्श्वभूमीवर उठून दिसणारे आहे. राजकारण हे धावपळीचे आणि काही प्रमाणात संवेदना दुर्लक्षित करणाऱ्या वातावरणातले असू शकते. साहित्यिक व राजकारण यांचे समीकरण फार कमी व्यक्तिमत्त्वात दिसते. यशवंतराव मात्र जसे उत्तम राजकारणी होते तसेच ते उत्तम वाचक व लेखकही होते. त्यांचा राजकीय पिंड वेगाने वाढत गेला पण साहित्यिक पिंड मात्र काहीसा दुर्लक्षित राहिलेला आहे. भास्कर लक्ष्मण भोळे हे 'साहित्यिक यशवंतराव' या लेखात म्हणतात, "साहित्याच्या क्षेत्रात माझी भूमिका नम्र रसिक वाचकांची आहे', हे त्यांनी आवर्जून वारंवार सांगितले असले, तरी तेवढ्यापुरती ती मुळीच सीमित नव्हती. त्यांचा मूळ पिंडच प्रतिभावंताचा होता. राजकारणाच्या धकाधकीत यशवंतराव शिरले नसते, तर कदाचित साहित्याच्या इतिहासात अजरामर ठराव्यात, अशा साहित्यकृती ते निर्माण करू शकले असते, असे त्यांच्या प्रकाशित लेखनावरुन व भाषणावरून वाटते"07

यशवंतराव चव्हाण यांचे घराणे शेतकरी, ग्रामीण कुटुंबातील असल्यामुळे वाङ्मयीन संस्कार दुर्लक्षितच होते. परंतु यशवंतरावांचे मन संवेदनशील होते. प्रतिभेचे देणे त्यांना आईकडून मिळाले होते. मराठी माणूस, भाषा, साहित्य व संस्कृती यांचे संस्कार त्यांना महत्त्वाचे वाटत होते हे विषय त्यांना जिव्हाळ्याचे वाटत होते. लहानपणापासून त्यांना वाचनाचे वेड होते. संतांची अभंगवाणी ते ऐकत, वाचत व म्हणत असत. कवितासंग्रह वाचणे, नाटक पाहणे, मोठमोठ्या कलाकारांची गाणी ऐकणे यात त्यांची रसिकता दिसून येते.

डॉ. सुजाता गायकवाड लिहितात, "राजकारण व साहित्य या दोघांचे शब्द हे माध्यम आहे. म्हणून राजकारणी साहित्यकारांचे शब्दबंध असतात, अशाप्रकारे साहित्यिकांचा गौरव करणारे यशवंतराव चव्हाण ललित साहित्यिक होते. वाङ्मयीन दृष्टीसलेले नेते होते. उदात्त साहित्य व उदात्त राजकारण हे मांडीला मांडी लावून वावरण्याचे खरे कसब यशवंतरावांनी त्यांच्या वर्तणुकीने दाखविले होते."08

यशवंतराव चव्हाण यांनी विविध प्रकारात लेखन केले आहे. चरित्र, आत्मचरित्र, वैचारिक, ललित, प्रवासवर्णनपर असे त्यांचे लेखन आहे. त्यांची भाषा, लेखणी आणि वाणी मृदू मनाची असल्याने त्यांना साहित्य क्षेत्रात खूप मित्र होते. साहित्याच्या क्षेत्रात नम्रता, प्रतिभाशालीनता आणि रसिकता जपणे फार महत्त्वाचे असते. यशवंतराव चव्हाण यांच्याकडे या गुणांची पर्वणी होती. कवी ना. धों. महानोर लिहितात, "यशवंतरावांना नवीन पुस्तकं वाचण्याचं वेड होतं, प्रकाशित झालेली नवी चांगली पुस्तकं ते मागवून घेत, एवढ्या व्यापात ते केव्हा, कसे, कधी वाचत असत याचं कोडं मला अजूनही सुटलेलं नाही. वर्षभरातली मराठीतली पंचवीस–पन्नास तरी त्या वर्षाची निवडक चांगली पुस्तकं त्यांनी वाचलेली असायची, भेटीत ते त्या पुस्तकांच्या चर्चा करीत आपली मतं तपासून घेत, खूप लेखक व प्रकाशक त्यांच्याकडे नियमित पुस्तकं पाठवीत असत."[09]

यशवंतराव चव्हाण यांच्या साहित्यिक व्यक्तिमत्त्वाचा मराठी माणसावर प्रभाव आहे. त्यांचे लेखन हे अनुभवशील व नीतीशील आहे. ॲड. रावसाहेब शिंदे लिहितात, "यशवंरावांचे कर्तृत्व चौफेर स्वरूपाचे होते. आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार लोकनेता, समतोल राजकारणी, कुशल मुत्सद्दी, व्यवहार चतुर प्रशासक, अफाट लोकसंग्राहक, साहित्यिक, उत्तम वक्ता, कलारसिक, तत्वचिंतक, कुटूंबवत्सल अशी विविध विशेषणे त्यांचे परिपूर्ण व्यक्तिमत्व साकारण्यासाठी अपुरी आहेत, असेच म्हणावे लागेल."[10]

यशवंतराव चव्हाण यांचा इतिहास, राज्यशास्त्र, प्रशासन याबाबतीत चांगला अभ्यास होता. त्यांचे चौफेर वाचन व लेखन यामुळे त्यांना महाराष्ट्राची विकास दिशा व माणसाची अवस्था चांगली कळली. ॲड. रावसाहेब शिंदे लिहितात, "महाराष्ट्राची आजची प्रगती आणि त्याचबरोबर महाराष्ट्राचे पुरोगामित्त्व हे यशवंरावांच्या विचारांचा आधारे प्रगल्भ झाले आहे. हे विसरता येणार नाही. शिक्षण, सहकार, विज्ञान, तंत्रज्ञान, कला, साहित्य अशा जीवनाच्या विविध क्षेत्रावर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची विचारांची छाप आजही पडलेली दिसते." [11]

ॲड. रावसाहेब शिंदे यांनी यशवंराव चव्हाण यांच्याशी बऱ्याच वेळी शैक्षणिक, सामाजिक, साहित्यिक विषयावर चर्चा केली आहे. त्यामुळे यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वाचा त्यांनी घेतलेला शोध व बोध समजून घेण्यासारखा आहे. यशवतंराव हे उत्तम रसिक, साहित्यिक व सज्जन वृत्तीचे होते.

डॉ. प्रभाकर माचवे लिहितात, "मानवतावादाचा धडा त्यांनी केवळ पुस्तकातून घेतलेला नाही. तो निव्वळ बौध्दिक विकास म्हणून त्यांनी अंगिकारलेला नसून त्यांच्या जीवनात आणि कृतीत उतरलेला तो मराठी बाणा आहे. ते कर्तव्यकठोर पण अत्यंत सह्रदय असे बुध्दिवंताचे मित्र आहेत. साहित्यिकांच्या स्नेहादराचे स्थान आहे. त्यांच्यात त्यांची सत्शील वृत्ती उत्तम आहे. " [12]

यशवंतराव चव्हाण यांच्यातील साहित्यिक सदैव जनकल्याणाची भूमिका घेऊन लिहिणारे होते. ते माणूसप्रिय व्यक्तिमत्त्व होते. राजकारणाच्या धकाधकीत त्यांनी लेखन, वाचनासाठी वेळ काढला, वेळ शोधला त्यांनी त्या दिशेने मनापासून प्रयत्न केले.

प्रा. दिनकर पाटील, प्रा. जे. के. पवार, यांनी लिहिले आहे. "...साहित्यिक यशवंराव चव्हाण आपल्या धकाधकीच्या राजकीय जीवनातून वेळ काढून इतरांच्या आणि विविध प्रकारच्या साहित्यवृत्तीचे वाचन करीत आणि त्यास प्रस्तावना लिहून देत. सत्तेच्या, राजकारणाच्या जंगलात राहूनही साहेबांनी सुसंस्कृतपणा सोडला नाही. अनेक साहित्यिक आणि विद्वान त्यांचे मित्र होते. त्यांना ग्रंथांचा लोभ होता. शब्दांवर त्यांचे प्रेम होते. आपल्या भाषणात अनेकदा असा चपखल शब्दप्रयोग करीत की, प्रथितयश साहित्यिकलाही त्यांचा हेवा वाटावा, उत्तम शब्दरचनेला रसिकतेने ते दाद देत."[13]

कराड येथील साहित्यसंमेलनप्रसंगी यशवंराव चव्हाण यांनी केलेले भाषण त्यांच्या साहित्यिक गुणवैशिष्ट्यावर

प्रकाश पाडणारे आहे. 'साहित्य आणि प्रबोधन' या संदर्भात त्यांचे मौलिक विचार आहेत. यशवंतराव चव्हाण म्हणतात, 'मराठी वाङ्मयाच्या दृष्टीने साहित्यिकांनी विचार करण्यासाठी मी आणखी दोन मुद्दे मांडतो. ते म्हणजे मराठी वाङ्मयाची गुणवत्ता आणि विस्तार दोन्ही दृष्टींनी त्याचा अन्य भारतीय भाषा आणि प्रगत जागतिक भाषा यांच्याशी सांधा जुळविणे आवश्यक आहे. पाश्चात्य इंग्रजी वाङ्मयाचा परिचय, त्यांचे संघर्ष आपल्या भाषेत आणणे आवश्यक आहे. विशेषतः आशिया व आफ्रिका यातील साहित्याचा, त्यातील विचारांचा मोठ्या प्रमाणात वापर करून घेणे आवश्यक आहे. आपल्या मनाचे जे पश्चिमीकरण झाले आहे, ते ऐतिहासिकदृष्ट्या अपरिहार्य असले, तरी आता योजनापूर्वक इतर विश्वसाहित्याचा व्यापक व सखोल अभ्यास झाला पाहिजे."[14]

यशवंतराव चव्हाण यांचे साहित्यकार्य प्रेरणात्मक आहे. त्यांच्या जीवनजाणिवा माणुसकीच्या दृष्टीने व्यापक होत्या. त्यांच्या या दृष्टिकोणाचा प्रत्यय त्यांच्या लेखनात दिसतो. मधुकर भावे लिहितात, "यशवंतराव चव्हाण हे सर्वार्थाने निखळ साहित्याचे उपासक होते. मराठी, हिंदी, इंग्रजी या भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. लहानपणी त्यांनी राजकारणाबरोबरच कार्लमार्क्स वाचत असताना संत वाङ्मयाचेही चिंतन करून संत वाङ्मय वाचलेले होते. हरिभाऊ आपटे हे त्यांचे आवडते लेखक होते. यशवंतरावांची अनेक साहित्यविषयक भाषणे भल्याभल्या साहित्यिकांना साहित्य व्यासपीठावर निष्प्रभ करून टाकीत होती. त्यांना साहित्याची मोठी जाण होती आणि ती करून, त्यामुळे सरकार म्हणजे निव्वळ धरणे बांधणे, रस्ते बांधणे एवढेच काम करीत नसून, सरकारचा एक डोळा सांस्कृतिक असला, पाहिजे असा त्यांचा आग्रह होता."[15] तर डॉ. विश्वास मेहेंदळे लिहितात, "सान्या कामाबरोबरच साहित्य, संस्कृती, कला यांच्या संगोपन, संवर्धनासाठी अनेक नवनवीन योजनांना जन्म देऊन त्या योजना राबविण्याचं काम केलं"[16] यशवतरांव चव्हाण यांच्या साहित्यिक व्यक्तिमत्त्वाचा अनेकांनी घेतलेला शोध मराठी वाङ्मयात वैशिष्ट्यपूर्ण आहे.

### समारोप :

यशवंतराव चव्हाण (12 मार्च 1913 ते 25 नोव्हेंबर 1984) यांची जीवनगाथा मानवी संस्कृतीला दिशादर्शक आहे. त्यांची आई विठाई आणि वडील बळवंतराव शेतकरी घरातील होते. 1918 मध्येच यशवंतरावाचे पितृछत्रहरपले. ज्ञानोबा, राधाबाई, गणपतराव या कुटुंबात यशवंतराव वाढले. त्यांचे बालपण देवराष्ट्र येथे विकसित झाले. कराड येथे गेल्यानंतर पुढे त्यांनी बी.ए.एल.एल.बी. पर्यंत शिक्षण घेतले राजकारणात सक्रीय झाले पण त्यांच्या संवेदनशील मनाने लेखन, वाचनाची संस्कृती विकसित केली त्यांनी विविध वाङ्मय प्रकारात लेखन केले. 'कृष्णाकाठ' आत्मचरित्र, 'भूमिका', 'युगांतर', 'सह्याद्रीचे वारे' , 'विचारधारा', 'शिवनेरीच्या नौबती', हे त्यांचे भाषणसंग्रह आहेत. 'विदेशदर्शन' (पत्रसंग्रह) , 'ऋणानुबंध', (लेखसंग्रह) आणि इतर लेखन त्यांच्या नावावर आहे. राजकारणातील एक संवेदनशील साहित्यिक म्हणून त्यांचे वेगळेपण उठून दिसणारे आहे. यशवंतरावांच्या वाङ्मयाने मराठी साहित्याला राजकीय संस्कृतीबरोबर साहित्यअनुभवातील भाषावैभव दिले आहे.

ते मराठी मनाला आणि एकूणच मानवतेला संजीवन देणारे आहे. अशा यशवंतराव चव्हाण यांच्या 'साहित्यिक व्यक्तिमत्वाचे' संशोधन झाले पाहिजे.

### संदर्भटीपा :


01. यशवंतराव चव्हाण, उद्धृत, 'युगप्रवर्तक यशवंतराव' ;संपादक, ॲड. रामनाथ वाघद्व, यशवंतराव चव्हाण व्यासपीठ, अहमदनगर प्रकाशन रामनाथ वाघ, अहमदनगर, दि. 15 फेब्रुवारी 2008, पृ.04.

02. तत्रैव, पृ. 04

03. रामनाथ वाघ, तत्रैव, पृ. 26

04. रा.रं. बोराडे, 'यशवंतरावांचे बालपण', तत्रैव, पृ. 128.

05. भास्कर लक्ष्मण भोळे, 'यशवंतराव चव्हाण, 'राजकारण आणि साहित्य ', प्रकाशक बाबा भांड, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, 16 डिसेंबर 1985, पृ. 124.

06. जान्हवी संत, 'चरित्र आत्मचरित्र', मोघे प्रकाशन, कोल्हापूर, 1974, पृ. 44.

07. भास्कर लक्ष्मण भोळे, उनि, पृ. 117.

08.सुजाता गायकवाड, 'यशवंतराव चव्हाण : भाषा, साहित्य व संस्कृती' लेख 'महाराष्ट्राचे भाग्यविधाते यशवंतराव चव्हाण', गौरवग्रंथ–संपादक डॉ. अशोक नाईकवाडे, प्रकाशक विद्याभारती प्रकाशन, लातूर 26 जून 1912, पृ. 291, 292.

09. ना. धों. महानोर, 'यशवंतराव चव्हाण', प्रकाशक बाबा भांड, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, 25 नोव्हेंबर 1991, पृ. 67.

10.रावसाहेब शिंदे, 'विचारवेध', प्रकाशक उल्हास लाटकर, अमेय इन्स्पायरिंग बुक्स, पुणे, 5 सप्टेंबर 2013, पृ. 136 ते 137.

11.तत्रैव, पृ. 137.

12.प्रभाकर माचवे, 'रसिक साहित्यिक सज्जन' (लेख– यशवंतराव–कर्तृत्व आणि नेतृत्व–संपादक, शंकर सारडा), प्रकाशक, राजीव दत्तात्रय बर्वे, दिलीपवराज प्रकाशन, पुणे दि. 15 जून 2003, पृ. 100.

13.दिनकर पाटील, जे. के. पवार, 'प्रस्तावनाकार यशवंतराव चव्हाण', प्रकाशक अनिल मेहता, मेहता, पब्लिसिंग हाऊस, पुणे 25 नोव्हेंबर, 1987, प्रस्तावना, पृ. 7,8

14.यशवंतराव चव्हाण, 'ऋणानुबंध', प्रकाशक प्रेस्टीज पब्लिकेशन्स, पुणे दि. आ. 10 एप्रिल 1986, पृ. 204.

15.मधुकर भावे, 'यशवंतराव ते विलासराव', प्रकाशक, अरविंद घनःश्याम पाटकर, मनोविकास प्रकाशन, पुणे, जानेवारी 2008, प्र. 40–41.

16.विश्वास मेहेंदळे, 'यशवंतराव चव्हाण ते पृथ्वीराज चव्हाण', प्रकाशक अ. ज्ञ. कुलकर्णी, अनुबंध प्रकाशन, पुणे, चौथी सुधारीत आ. 10 ऑगस्ट 2012 पृ. 80.